# University of Mumbai


परीक्षा विभाग/विज्ञान निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०००९८.


क्र.परीक्षा/परीक्षा अर्ज/निकाल कक्ष/2010 /२०१९.

परिपत्रक :–

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपकेंद्राचे समन्वयक व सहायक कुलसचिव यांना या परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात येते की, **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम–२०१६** च्या तरतुदीनुसार विद्यापीठाने परीक्षांचे निकाल वेळेवर जाहिर होण्याकरीता परीक्षांच्या पध्दतीमध्ये काही अमुलाग्र बदल करण्याचे ठरविले आहे. परीक्षांचे निकाल वेळेवर जाहिर होण्याकरीता विद्यापीठाच्या या धोरणास सकारात्मक प्रतिसाद देणे अपेक्षित असून विद्यापीठाने बदललेल्या प्रक्रियेची विद्यार्थी व महाविद्यालयांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

उपरोक्त धोरणानुसार शैक्षणिक वर्ष २०१९–२० मधील उपरोक्त संदर्भीय परिपत्रकांमधील द्वितीय सत्र (हिवाळी) २०१९ मधील **परीक्षा क्र. 1S02315-M.Sc(Hotel & Hospitality Administration)(Sem-V) (3years Course) & 1S02411-M.Sc(Financ)(CBSGS)(Sem-I)** या परीक्षेचे परीक्षा प्रवेश अर्ज विहीत फीसह **M.K.C.L.** या अभिकरणामार्फत Digital University Portal (**mum.digitaluniversity.ac**) वरून Online घेण्यात येणार आहेत.

सदर परिपत्रकामध्ये नमुद केलेल्या अभ्यासक्रमाचे परीक्षा प्रवेश अर्ज Digital University Portal (mum.digitaluniversity.ac) वरून Online स्विकारण्याच्या तारखांचा तपशील खालील प्रमाणे आहे:–

| अ. क्र. | परीक्षा शुल्क | महाविद्यालयाने Online अर्ज भरण्याची व Inward करण्याच्या तारीख | परीक्षा शुल्क भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|
| १. | नियमित शुल्क | २१/१२/२०१९ ते ३१/१२/२०१९ | ०२/०१/२०२० (दुपारी ५.०० वाजेपर्यंत) |

तरी वर नमुद केलेल्या तारखांच्या तपशीलाप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम/सत्र निहाय परीक्षा प्रवेश अर्ज परीक्षा अर्ज भरून घेण्यापासून ते परीक्षा शुल्क भरण्यापर्यंतच्या सर्व प्रक्रिया Digital University Portal (mum.digitaluniversity.ac) वर पूर्ण करून त्यांचे परीक्षा अर्ज भरण्याच्या तपशीलाची प्रत (Exam Form Submission Report) व परीक्षा शुल्क भरल्याची पावती परीक्षा विभागात वरील तारखांप्रमाणे हस्तेपोच जमा करण्यात यावी. पोस्टाने अथवा कुरीअरने पाठविल्यास स्विकारले जाणार नाही.

परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याच्या **अति विलंब शुल्काच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी ५.०० वाजता (३१/१२/२०१९ रोजी) Inward Link आपोआप बंद होणार असल्यामुळे परीक्षा अर्ज Inward करता येणार नाहीत** व परीक्षा स्विकारण्याची मुदत कोणत्याही परिस्थीतीत वाढवून दिली जाणार नाहीत या बाबींची नोंद घेण्यात यावी.

विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज Inward करण्यापूर्वी महाविद्यालयांनी संबंधीत विद्यार्थ्यांचे छायाचित्र, स्वाक्षरी, नाव (मराठी व इंग्रजी या दोन्ही लिपीत), माध्यम, परीक्षा केंद्र, विषय व दिव्यांग (Person with disability) इ. बाबी बरोबर आहेत, याची खात्री करून घ्यावी. सदर माहिती गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र यासाठी वापरण्यात येणार आहे. **परीक्षा अर्ज Inward झाल्यावर वरील कोणतीही दुरूस्ती करता येणार नाही, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.**

परीक्षा अर्ज Inward करण्यापूर्वी महाविद्यालयांच्या Login मधून परीक्षेचे विषय बदल करता येतील. परीक्षा अर्ज Inward झाल्यानंतर परीक्षेच्या विषयामध्ये बदल करायचा असल्यास प्रती विषय ५० रू. प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

परीक्षा अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेनंतर कोणत्याही परिस्थितीत परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदत वाढवून दिली जाणार नाही याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी. तसेच यासंदर्भात प्रशासनातील वरीष्ठांकडे विनंती करून त्यांचा अमुल्य वेळ वाया घालवू नये ही विनंती.

Exam Circular/DR Pagare

तरी या परिपत्रकामध्ये नमुद असलेल्या सर्व बाबींचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

(डॉ. विनोद पाटील)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई.
दि. : २१/१२/२०१९.

Scanned by CamScanner